# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २६.०७.२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे (अंदाजपत्रकीय सभा २००५-२००६) इतिवृत्त.

सभेची सुरूवात 'वंदेमातरम्' या गिताने झाली. मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत मा.आयुक्त यांचेसह संबंधित विभाग प्रमुख व स.नगरसेवक उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मीन बेगम अ.कदीर
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन

३१. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
४०. स.स.श्री.शेख मुनाफ शेख यासीन
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४८. स.स.श्री.पटेल सलीम समशेर पटेल
४७. स.स.श्री.मोतीवाला अशरफ मो.युनूस
५०. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५१. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५८. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६१. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६२. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६३. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६६. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६५. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६६. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६८. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय

६९. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
७०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७८. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७९. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८०. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८२. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.जगताप संजय : औरंगाबाद शहराचे शिल्पकार व दिवंगत नेते डॉ.रफिक झकेरिया यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.कराड भागवत : डॉ.रफिक झकेरिया हे औरंगाबाद शहर व सिडको-हडकोची जी रचना केली, त्या रचनेचे डॉ.रफिक झकेरिया हे प्रणेते होते. त्यांनी या शहरासाठीची पाण्याची पाईप लाईन व शहराचा आराखडा बदलून टाकणेची योजना आखली अशा थोर नेत्याचे शहरामध्ये स्मारक उभारावे आणि श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : स.स.श्री.डॉ.भागवत कराड यांनी जी सूचना केली त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.अ.रशिद खॉन (मामु): दिल्लीगेट ते मौलाना आझाद कॉलेज मार्ग पर्यंतचा हर्सूलला जाणारा जो रस्ता आहे, त्यास डॉ.रफिक झकेरिया मार्ग असे नांव देण्यात यावे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : स.स.श्री.जेजुरकर यांच्या वडिलांचे नुकतेच दु:खद निधन झाले, त्यांनाही सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी. त्याचप्रमाणे शिक्षणतज्ञ डॉ.रफिक झकेरिया यांचे बाबतीत स.स.श्री.रशिद मामु यांनी सूचना केली त्याप्रमाणे सभागृहाने मंजूरी देणे उचित होईल.

मा.महापौर : ठिक आहे. डॉ.रफिक झकेरिया तसेच स.स.श्री.जेजुरकर यांचे वडिलांचे दु:खद निधन झाले, त्यांना सभागृहात दोन मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी. (यावेळी सभागृहात दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात येते.)

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : सभागृहामध्ये प्रत्येक स.सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. कूणीही मध्ये हस्तक्षेप करू नये. सर्वांवर मा.महापौर यांनी देखरेख ठेवून मार्गदर्शन करावे.

मा.महापौर : स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सूचनांची अंमलबजावणी सर्वांनी करावयाची आहे. एक सदस्य बोलत असतांना दूसऱ्या सदस्यांनी उठून उभे राहून बोलू नये,

याबाबतची दक्षता घ्यावी आणि आता विशेष सर्वसाधारण सभा अंदाजपत्रका बाबत असल्याने या सभेमध्ये फक्त या विषयावरच चर्चा करावी.

**विषय क्र. ४३/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

**संवाद :**

मुख्यलेखाधिकारी : सर्व नवनिर्वाचित स.सदस्यांचे या पंचवार्षिक अर्थसंकल्पातील पहिल्या सभेसाठी सर्वांचे स्वागत करतो. अर्थसंकल्पाबाबत कलम ९६ अन्वये मा.स्थायी समितीने अर्थसंकल्प मंजुर करून नेहमीच्या प्रथेप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करावयाचा असतो. त्यानुसार मी मा.सभापती,स्थायी समिती यांना विनंती करतो की, त्यांनी स.पदाधिकारी यांचे स्वागत करून आजचा अर्थसंकल्प स्थायी समितीने मंजुर केलेला आहे तो मा.सर्वसाधारण सभेसाठी मा.महापौर यांचेकडे सादर करावा. (तत्पूर्वी मा.सभापती यांनी सर्व स.पदाधिकारी यांचे स्वागत करून अर्थसंकल्प मा.महापौरांना सादर करतात.)

मा.सभापती : महानगरपालिका औरंगाबादचे दि.१ एप्रील २००५ ते दि.३१ जुलै २००५ पर्यंतचे लेखा अनुदान व सन २००५-२००६ चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त श्री.असीम गुप्ता यांनी दि.०६.०७.२००५ रोजी स्थायी समिती समोर सादर केले. सदरील अंदाज पत्रकावर दि.१२.०७.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेत सर्वकष चर्चा होवून सदर प्रस्तावास या बैठकीत ठराव क्र.१५ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचा हा तेविसावा अर्थसंकल्प सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. ०८ डिसेबंर १९८२ ला औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आली. १९८३-८४ चा पहिला प्रशासकीय अर्थसंकल्प ०७ कोटीचा होता. या पार्श्वभुमीवर महानगरपालिकेचा दोनशे कोटीचा टप्पा ओलांडणारा हा पहिलाच अर्थसंकल्प असल्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला आहे.

मनपा ही स्वायत्त संस्था आहे. उत्पन्न आणि खर्च या दोन्ही बाजु मनपाला पाहाव्या लागतात. या अर्थसंकल्पात नवीन करवाढ सुचविण्यात आलेली नाही. उत्पन्न वाढविण्यासाठी करवाढ हा एकमेव पर्याय असल्याचे मला मान्य नाही. त्याऐवजी फुगत चाललेल्या करांच्या थकबाकीकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. करवाढीचा फटका नेहमीच प्रामाणिक करदात्यांना सहन करावा लागतो. अशा प्रामाणिक करदात्यांवर अन्याय होवू नये म्हणून करवाढी ऐवजी थकित कर वसूलीला प्राधान्य देण्यात आले आहे. 'नाही रे' वर्गाला अत्यावश्यक त्या सेवा-सुविधा मिळाल्याच पाहिजे परंतु ज्या प्रामाणिक करदात्यांच्या बळावर हा 'जगन्नाथाचा रथ' चालतो, त्यांना त्याचे फळ मिळायलाच पाहिजे. या अर्थसंकल्पात त्याचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून आल्यास नवल नाही.

मालमत्ता कर आणि पाणीपट्टीची थकबाकी आज रू.६२ कोटीच्या घरात आहे. ही थकबाकी वसूल झालीच पाहीजे असा माझा आग्रह आहे. शेवटी हक्क आणि कर्तव्य ही कोणत्याही संस्थेची दोन चाके आहेत. सुविधा मिळणे हा हक्क आहे तर कर भरणे हे कर्तव्यच ठरते ! जनतेने जनतेच्या सेवेसाठी कर्तव्य पालन केलेच पाहीजे. त्यात तडजोड करता येणार नाही.

जकातीचे उत्पन्न हे तर महानगरपालिकेचे मुख्य आर्थिक स्त्रोत आहे. ते वाढलेच पाहिजे पण त्याच बरोबर जकात चोरीही थांबली पाहीजे...., त्यासाठी जकात विभागाचे संगणकीकरण, भरारीपथके आदि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना आहे.

शहराचा विकास म्हणजे केवळ भौतिक विकास नव्हे ! या शहराचा औद्योगिक विकास ठप्प झाल्यासारखी परिस्थिती आहे. औद्योगिक वसाहती पुन्हा गजबजल्या पाहिजे. बेकारांच्या हातांना काम मिळाले पाहीजे, त्यांचा आर्थिक स्तर उंचावला पाहिजे. कर भरण्याची आर्थिक कुवत नागरीकांत निर्माण झाली पाहिजे तरच पर्यायाने मनपाचे उत्पन्न वाढु शकेल आणि भौतिक विकास साधणे शक्य होईल असे माझे चिंतन आहे. हा दृष्टीकोन ठेवूनच उद्योगांना करात सवलती देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याचा लाभ घेण्यासाठी आता उद्योजकांनी पुढे येण्याची गरज आहे.

औरंगाबाद शहरातील अनाधिकृत वसाहती हा सुध्दा एक महत्वाचा प्रश्न आहे. अशा वसाहतीमधील नागरिक मनपाच्या स्थापनेपासून नगरसेवक निवडून देत आले आहेत परंतु अनाधिकृत असा शिक्का या वसाहतींवर लागल्यामुळे तेथे विकास करता येत नाही, किमान नागरी सुविधाही उपलब्ध करून देणे शक्य होत नाही अशी विचित्र परिस्थिती आहे. या संदर्भातही माझी भुमिका स्पष्ट आहे. या वसाहतीमधील नागरिकांमुळे मनपाला किमान चार टक्के जकात मिळतोच मिळतो. त्यामुळे किमान चार टक्के उत्पन्नावर त्यांचा अधिकार निश्चितपणे पोहचतो. या वेळी प्रथमच अशा वसाहतीमधील किमान नागरी सुविधासांठी रू.२.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद शहर हे देशातील एक महत्वाचे पर्यटन शहर आहे याचे भान ठेवून येथे येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांना आनंद मिळण्यासाठी शहराच्या सौंदर्यीकरणांवर तसेच उद्यानांचा स्तर वाढविणाऱ्यावर भर देण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या रूग्णालयात येणाऱ्या गरीब व गरजु रूग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचे मोफत मार्गदर्शन उपलब्ध व्हावे असा दृष्टीकोन ठेवून शहरातील महात्मा गांधी मिशन या प्रसिध्द संस्थेच्या सहकार्याने योजना राबविण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे शहराची सन २०२० ची अपेक्षित लोकसंख्या विचारात घेवून जायकवाडी ते नक्षत्रवाडी समांतर जलवाहीनी टाकण्याचा अभ्यास करणे व प्रस्ताव तयार करणे बी.ओ.टी. तत्वावर ज्योतीनगर जलतरण तलाव बांधणे, वसंत भवन येथे व्यापारी संकुल बांधणे, रेल्वे स्टेशन व्यापारी संकुल, औरंगपुरा येथे भाजी मंडई बांधणे, डिफर पेमेंट तत्वावर रस्ते बांधणे, या मोठ्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, आदी योजना अर्थसंकल्पाची वैशिष्टे ठरावित असा विश्वास वाटतो.

प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील इतर सर्व बाबींवर स्थायी समितीचे सर्व सदस्यांनी मार्गदर्शन करून व त्यात काही फेरफार सूचवुन स्थायी समितीने सन २००५-२००६ चे मुळ अंदाजपत्रक रू.२३० कोटी ८ लाख १० हजार जमा व त्यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.२ कोटी ८० लाख ४५ हजार विचारात घेता एकूण रू.२३२ कोटी ८८ लाख ५५ हजार एकूण जमेचा व रू.२३२ कोटी ७५ लाख ४० हजार खर्च विचारात घेवून रू.१३.१५ लाख शिलकीचे अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार प्रस्तावास मान्यता देवून मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करीत आहे. स्थायी समितीने या अर्थसंकल्पात सुचविलेली विकास व देखभाल दुरूस्तीच्या

कामात कोणत्याही स्वरूपाची कपात न करता त्यास मा.सर्वसाधारण सभेने त्यावर सर्वकष विचार करून मान्यता प्रदान करेल अशी मी आशा बाळगतो. शहराचा विकास करण्यासाठी सर्व स.सदस्यांचे कामे उपलब्ध निधीनुसार कमी जास्त प्रमाणात घेण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे केलेला असुन यापूढेही सर्व सदस्यांचे मला भविष्यातही सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त करतो.

सदरील अर्थसंकल्प तयार करतांना मा.महापौर श्री.किशनचंद तनवाणी उपमहापौर श्री.भगवान घडमोडे, सभागृह नेता श्री.संजय शिरसाट, विरोधी पक्ष नेता श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांनी बहुमोल मार्गदर्शन केले तसेच अत्यंत अभ्यासपुर्ण जमा व खर्चाचे अंदाज मा.आयुक्त श्री.असीम गुप्ता यांनी मांडले व मुख्यलेखाधिकारी श्री.महेंद्र खैरनार व त्यांचे सहकारी यांनी या कामी अथक परिश्रम घेतले त्या बद्दल मी त्यांचा ऋणी आहे तसेच प्रसारमाध्यमांचे सर्व पत्रकार बंधु, टि.व्ही.चॅनलचे प्रतिनिधी, स्थानिक चॅनलचे प्रतिनिधी, आकाशवाणी यांनी वेळोवेळी मला केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी असून भविष्यातही त्यांच्या सहकार्याची मला नितांत आवश्यकता भासेल.

धन्यवाद !

श्री.कराड भागवत : मा.सभापती यांनी २३ व्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये अत्यंत चांगल्याप्रकारे मांडणी करून अर्थसंकल्प सादर केलेला आहे. याबाबत मी स्थायी समिती व सर्व स.सदस्यांचे स्वागत करतो. कारण मागील वर्षीचे अंदाजपत्रक रू.१७२ कोटीचे होते आणि या वर्षीचे रू.२३२ कोटीचे दिसत आहे. ही या वर्षीची अभिनंदनिय बाब होय. या अंदाजपत्रकात कोणत्याही प्रकारचे करामध्ये कमी अथवा वाढ केलेली दिसून येत नाही. या वर्षीच्या एकाच वर्षात रू.७० कोटीने वाढ असलेले हे औरंगाबाद महानगरपालिकेतील ऐतिहासिक अर्थसंकल्प आहे. यामध्ये सर्वसामान्य जनेतवर कोणतेही कराचा बोजा लादलेला नाही. यामध्ये प्रामुख्याने प्रशासनाने स्थायी समितीला जे अंदापत्रक सादर केलेले आहे. त्यामध्ये रू.६२ कोटीची थकबाकी वसूली मालमत्ता करापोटीची जी आहे, ती पूर्णपणे वसूली करणेत येणार आहे, ही प्रशासनाने जोखीम घेऊन वसूलीचे काम करित असतील तर ही फार मोठी गोष्ट आहे. नुकत्याच महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका पार पडल्या त्यामध्ये नागरीकांचे ज्वलंत प्रश्न म्हणून पिण्याचे पाणी याबाबत निवडून आलेले उमेदवार व पडलेले उमेदवार यांना समजून आलेले आहे की,नागरीकांना भेडसावणारा बिकट प्रश्न म्हणजे पिण्याचे पाणी. यासाठी प्रशासन व स्थायी समितीने सन २०२० सालापर्यंतचे नियोजन कसे असावे, यासाठी पिण्याच्या पाण्याची योजना आखलेली आहे ती सुध्दा बाब अतिशय चांगली दिसून येत आहे. शहर वाढते आहे. लोकसंख्येत भरमसाठ वाढ होत आहे. हे शहर अनधिकृत बांधकामाने जवळपास १/३ व्यापलेले आहे. यासाठी शासन निर्णयाच्या गुंठेवारी पध्दतीमुळे जवळपास रू.२.०० कोटीची तरतूद या अंदाजपत्रकात केलेली आहे. ती कमी जास्त सभागृहाच्या समंतीने पुन्हा करता येऊ शकते. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्र चिकलठाणा येथील उद्योगधंदे बंद आहेत, त्यासाठी उद्योगधंदे पुन्हा चालू करून वाढवावयाचे असतील तर प्रशासनातर्फे जकातीबाबत पहिल्या वर्षी २०%, दूसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६० % याप्रमाणे उद्योगधंद्यांना महापालिकेतर्फे १००% ने चालना देण्यात येणार आहे.

श्री.देसरडा प्रशांत : मा.स्थायी समितीने अत्यंत कुशल व अभ्यासूदृष्टीने अंदाजपत्रक सादर केलेले आहे.स.सदस्य श्री.डॉ.कराड यांनी अभिनंदन केले.त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : सदरील अंदाजपत्रकात बऱ्याचशा त्रुट्या दिसून येतात. १. महसूली अंदाजपत्रक दाखविलेले आहेत ते फुगवून दाखवले असून ते बऱ्याच प्रमाणात बोगस आहेत असे दिसून येते. शहरातील मालमत्ता कर थकित वसूली बाबत २००४-२००५ च्या ३ पट ची वसूली दाखविलेली आहे. प्रशासन हे यावर्षी तिप्पट वसूली करणार आहे. हे प्रशासनामार्फत होईल किंवा नाही यात माझा संशय आहे. दूसरे असे की, ७१ कोटीची जकातीचे उद्दीष्ट केले आणि या वर्षी रू.८१.०० कोटीचे दाखविलेले आहे हे पूर्ण होईल किंवा नाही शंका येते. तसेच पाणीपट्टीची वसूली ११ कोटी होती ती आता ३७ कोटी इतकी केली आहे. ही सूध्दा तिप्पटीने आहे. कशी वसूली करणार यात सूध्दा शंका विरोधी पक्ष नेते म्हणून आपल्याला येते. यासाठी या तिन्ही बाबतीतचे जे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणात फुगवून ठेवलेले आहे, यात कमी करावे असे वाटते. वार्डनिहाय अंदाजपत्रकीय केलेले आहे,ते चूकीचे केलेले आहे. यात नेमक्या काही स.सदस्यांच्या वार्डासाठी भरीव अशी तरतूद केलेली दिसून येते याबाबतचे उदा. काही सदस्यांचे मी आपल्यासमोर मांडतो. १.श्री.संजय शिरसाट यांच्या वार्डासाठी रू.४२.०० लाखाची तरतुद केलेली आहे. २.सौ.जैन यांच्या वार्डासाठी रू.६४.३९ लाखाची तरतुद केलेली आहे. ३.श्री.राजु वैद्य यांच्या वार्डासाठी ७३.३६ लाखाची तरतुद केलेली आहे. तर ४.श्री.संजय जोशी यांच्या वार्डासाठी रू.२१.०० लाखाची तरतुद केलेली आहे. सौ.अनिता घोडेले यांचे वार्डासाठी ४२ लाखाची तरतुद ठेवली आहे. हे सर्व चारही वार्ड चांगले असून त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा सुरूवातीपासूनच्या आहेत. आणि ५.सौ.शिंदे मॅडम यांच्या वार्डासाठी शुन्य तरतुद केलेली आहे. म्हणजेच ज्या झोपडपट्टी व स्लम भागांना जास्तीची तरतुद ठेवावयास पाहीजे ती ठेवली नाही आणि ज्यांना आवश्यक नाही त्यांचे नावानुसार पक्षीय ताकदीने तरतुद केलेली आहे, याबाबत दुरूस्ती व्हावी. कारण सर्वांना सारखे न्याय द्यावा. माझे वार्डात सन १९९१ पासूनची काही सुविधा पूरविणे बाबत तरतुद करण्यास सूचविले. परंतु केलेली नाही. काही भागात खांडक्या दुरूस्तीची तर काही भागात रस्त्याच्या जोडणीसाठीची अंदाजपत्रकात तरतुद करणेची आवश्यकता आहे. बऱ्याच भागातील ड्रेनेज व पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठीचेही तरतुद करणे आवश्यक आहे. दुसरे असे की, स्थायी समितीने बी.ओ.टी. पध्दतीला मान्यता दिलेली आहे. यास आमचा विरोध आहे कारण बी.ओ.टी. पध्दतीची मंजुरी सर्वसाधारण सभेसमोर नव्याने मांडून अंमलबजावणी व्हावी. बी.ओ.टी.पध्दतीने आठवडी बाजार असो अथवा इतर कामे या महापालिकेच्या मालकीच्या पाहिजेत इतरांकडे देण्यात काहीच अर्थ नाही. स्वीमींग पुल हरकत नाही. भाजी मंडई बाबत लोन घेवून करावे. मिळकत आपणांकडे राहील. याबाबत अंदाजपत्रकात दुरूस्ती होवून सर्वसमावेशक अर्थसंकल्प असावा.

सौ.जोशी रजनी : अंदाजपत्रकामध्ये वार्डनिहाय तरतुद केलेली आहे. त्यामुळे स्थायी समिती सभापतींचे अभिनंदन. परंतु माझ्या वार्डात शाळा,स्मशानभूमी आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. याबाबत माझ्या वार्डाचा विचार वार्डनिहाय तरतुद करित असतांना केलेला दिसून येत नाही. म्हणजे माझ्या वार्डाचा क्रमांक का सुटला हे समजत नाही. याबाबत सभागृहाने विचार करून माझ्याही वार्डासाठीची तरतुद करावी.

श्री.माळवतकर महेश : स्थायी समितीने शहरातील सर्व बाबींची अडथळे घेवून अर्थसंकल्प सादर केला. त्याबाबत मी स्थायी समिती सभापतींचे अभिनंदन करतो. १) मालमत्ता कर व

पाणीपट्टी थकबाकी वसूलीबाबत एवढ्या मोठ्या प्रमाणात दाखविलेली आहे. यात प्रशासन लक्ष देणार आहे किंवा नाही कारण पाणीपट्टीची ३७ कोटीची व मालमत्तेची वसूली ३२ कोटीची वसूली आहे. तर होईल काय कारण जे नियमित कर भरतात त्यांनाही याचा विचार करावा लागेल की, आपण पाणीपट्टी नियमित नाही भरले तर चालेल काय? मालमत्ता कर नाही भरले तरी चालेल काय? या शहरात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ जे बडे थकबाकीदार आहेत त्यांचे वर्तमान पत्रात नांव जाहीर करतात आणि वसूली करतात त्याप्रमाणे या महानगरपालिकेतील मालमत्ता कर असो अथवा पाणीपट्टी असो थकित वसूली ही धनदांडग्याकडून वसूली करणार किंवा नाही आणि सार्वजनिक जिवनात सर्वसामान्य माणसांकडूनही तुम्ही तेवढेच वसूली करणार आहात किंवा नाही. महानगरपालिकेचे ब्रिदवाक्य सभागृहातील पिठासीन अधिकाऱ्याच्या पाठीमागे लिहिलेले वाचतोच 'निष्काम जनसेवा समर्पिता' याप्रमाणे सर्वसामान्य मानसाचे हित डोळ्यासमोर ठेवून कारभार चालला पाहीजे. आपण काही गाळे अपंगांना द्यावयाचे ठरविले, आजची परिस्थिती पाहता शिक्षण क्षेत्रात बालवाडी शिक्षिका कोण तर पदाधिकारी/अधिकारी यांची बहिण किंवा बायको अशी परिस्थिती आहे. म्हणजे एखाद्या गरिब अंगणवाडीचा कोर्स केलेल्या व्यक्तीला रू.५००/- महिन्याला पोट भरण्यापुरते पैसे तरी मिळणार किंवा नाही अशी शंका येते. कारण अधिकारी/कर्मचाऱ्यांना रू.पंचविस हजारापर्यंतचा पगार असूनही त्यांच्या घरची मंडळी नौकरीवर राहतात. आणि पुन्हा म्हणतात आमची महापालिका 'निष्काम जनसेवा' मी तर याला म्हणेल आपण या ठिकाणी खरोखरच सेवा करण्यासाठी बसलेलो आहोत काय? याचा आपण खरोखर विचार केला पाहीजे. कारण आपण अपंगांना गाळे देणार आहात तर खरोखर चांगली बाब आहे. पण असे अपंग नको की, जे पदाधिकारी/अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नातेवाईक आहेत. जे खरोखर शारिरिकदृष्ट्या अपंग आहेत, त्यानांच गाळे द्यावे. जेणे करून चार-पाच गरिब कुटूंबाचे जिवन चांगले होईल. आज मा.सभापती यांनी जकाती बाबतचे धोरण या अर्थसंकल्पात नमुद केले की, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील अनेक कारखाने बंद पडलेले आहेत, त्या क्षेत्रातील कारखाने चालू केल्यास दरवर्षी २०%,४०%, ६०%, प्रमाणे जकाती बाबतचे धोरणाची अंमलबजावणी केल्यास ज्या कंपन्या बंद पडल्या त्यापैकी अनेक बेरोजगारांना रोजी रोटीचा मुलभूत प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा होईल. आणि त्याचा फायदा आपल्या शहरासाठी होवू शकेल. याबाबत काही कंपन्यांनी महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केलेले आहे. त्याचाही विचार होणे गरजेचे आहे. नसता येथील गरवारे,ग्रिव्हज कंपन्या देखिल येथून हलवून इतर ठिकाणी स्थलांतर करतील याची नोंद घ्यावी. कारण चिकलठाणा क्षेत्रातील व्यवहार बाबत येथील सिडको/हडको भागासाठी सर्व व्यवहार चालतात. तेंव्हा आणखी जर औद्योगिक क्षेत्रातील कारखाने बंद पडली तर आणखीनच बेरोजगारीत भर पडेल. आणि त्याचे दुष्परिणाम शहराला भोवतील असे होवू नये. मा.महापौर महोदय आपणांस सांगु इच्छितो की, आपल्या कारकिर्दीत अशी चांगली कामे होवू द्या की, आपल्या पुढील बाबतीत चांगली चर्चा होवू शकेल. व स.पदाधिकारी व सभागृहाने चांगले निर्णय घेतले अशी सारखी वाहवा होईल. यावर आपण विचार करावा. आजचा जो अर्थसंकल्प आहे, अतिशय चांगला आहे, धोरणात्मक आहे. याबाबत प्रशासनाने सुध्दा कागदावर न ठेवता पुरेपूर अंमलबजावणी करावी. आणि काम करणे आवश्यक आहे. मी माझ्या झोनमधील बाब आपल्या निदर्शनास

आणून देतो की, स.नगरसेवक गेले की, पाणी,चहा, कॉफि आणि सर्वसामान्य माणसास काहीही नाही हे धोरण बदलेले पाहीजे आणि सर्वसामान्य माणूस या महानगरपालिकेला दुवा देईल नसता महापौर साहेब या महानगरपालिकेचे नांव वाढावे असे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

श्री.कराड भागवत : मला वाटते आता विषयाला सुरूवात करावी. जकात बाबत चर्चा करावी.

श्री.देसरडा प्रशांत : सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय सभेमध्ये चर्चा घडवून आणत असतांना उत्पन्नाच्या बाबीवर चर्चा करावी. मी २००४-२००५ या अर्थसंकल्पावर प्रथम बोलू इच्छितो मागील अर्थसंकल्पात रू.१७२ कोटीचे उद्दीष्ट ठेवलेले होते व त्यानंतर मात्र १३८ कोटीचे केले आणि प्रत्यक्षात मात्र १२२ कोटीची वसूली झाली. दुसरी बाब मागील वर्षी ठळक वैशिष्ट्ये एकूण दहा होते पैकी किती वैशिष्ट्ये पूर्ण झाले याचा विचार करावा. १२२ कोटीचीच वसूली का झाली याचा प्रश्न माझ्यासमोर उभा होतो. आणि आता आपण वसूल करणार आहेत २००५-२००६ मध्ये रू.२३२ कोटी ४० लाख २७५ त्यामूळे आता अशी शंका येते की, दरवेळी आपण पोलीस नेवून वसूली करतो. आणि आता तर २३२ कोटीची वसूली करावयाची म्हणजे वसूलीसाठी मिल्ट्री घेऊन जावे लागेल काय? असाही प्रश्न उपस्थित होतो की २७२ कोटी रूपये कसे वसूल होतील. मागिल वर्षीचे उद्दिष्ट १७२ कोटीचे होते. आणि मागिल थकीत ६५ कोटीची होती ती वसूली का झालेली नाही. त्यामूळे आमच्या समोर प्रश्न उभा राहतो. यावर्षी २३२ आणि पूढील वर्षी २५० कोटी होईल. परंतु वसूली आपण कशी करणार याबाबतचा खुलासा प्रशासनाने करावा. दरवर्षी पाणीपट्टी व मालमत्ता कराची दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे वसूली का होत नाही. शहरातील पाणीपट्टी ही नागरीकांना रू.१८००/- प्रति नळ कनेक्शन घेतो. परंतु प्रत्यक्षात १५५५/- हे महापालिकेला एका नळा मागे तोटा होतो. याचाच अर्थ असा आहे की, जेवढे नळ कनेक्शन अस्तित्वात आहेत तेवढेच कनेक्शन पाणीपट्टी वसूलीच्यावेळी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने जी.आर. दिला की, ना नफा ना तोटा याप्रमाणे ही योजना चालली पाहिजे याचाच अर्थ असा की, अजून १० हजार कनेक्शन असावेत. शहरातील कनेक्शनचा सर्व्हे करून शोधले पाहीजे म्हणजे रू.१५५५/- चा तोटा कुठेतरी कमी होईल. सांगायचे म्हणजे मागिल वर्षीचे रू.१७२ कोटीचे उद्दिष्ट आपण पूर्ण करू शकलो नाही. आणि पुन्हा आता रू.३२ कोटीचे कर्ज बँकेकडून घेत आहोत ते कोणत्या कारणासाठी याचा खुलासा प्रशासनाने करावा. या शहरात महापालिकेने ७५ : २५ या पध्दतीने चार ते पाच योजना तयार केले याद्वारे महापालिकेला करोडो रूपये भाडे प्राप्त झाले असते. या इमारतींचे हस्तांतर का करीत नाही. संबंधितांनी आपल्याला पत्र दिलेले आहे की, या वास्तु हस्तांतर करून भाडे तत्वावर द्या परंतु ते आपण अद्यापही करू शकलेलो नाही. दुसरे उत्पन्नाची बाजू मांडतांना जकात संगणकीकरण करावे व जकातीचे उत्पन्न वाढवावे ही संकल्पना दरवर्षीच्या उद्दिष्टामध्ये असते. आता यावर्षी मा.आयुक्त व मा.महापौर यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेला जकात अधिक्षकाला पाठवून तेथिल परिस्थितीचा आढावा घेतला व कार्यवाही यावेळी निश्चित होईल.

श्री.जोशी संजय : मा.सभापती यांनी अतिशय अभ्यासू दृष्टीने अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सगळ्या शहराला थोडा थोडा न्याय दिला गेला. दरवर्षी अर्थसंकल्प मंजुर झाल्यानंतर शेवटी शेवटी ५० कोटी, २५ कोटी अशी तूट होत गेली. मागील वर्षीच्या १७२ कोटीत रू.५० कोटीची तूट झालेली होती. मा.आयुक्त महोदयांनी

स्थायी समितीकडे अतिशय सुंदर असे २३२ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला मात्र डिसेबंर महिन्यात पुन्हा रिव्हाईज अर्थसंकल्पासाठी बैठक होईल त्यावेळी वसूली कमी झाले असे कारण सांगु नये. कारण जकात,मालमत्ता व पाणी पट्टी वसूलीसाठीचे उद्दिष्ट हे पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, जेणे करून एका उपआयुक्त (म.) यांचेकडे जकातीचे तर करमुल्य निर्धारण अधिकारी यांचेकडे मालमत्ता व पाणीपट्टी वसूलीचे उद्दिष्ट आहे ते त्यांनी यशस्वीपणे राबवतील यात मात्र शंका नाही. सन १९९३ पासून महानगरपालिकेतील शाळांचे असेसमेंट होवून महाराष्ट्र शासनाकडे गेलेले नाही. जवळपास २.०० कोटी रूपये शासनाकडून आपल्याला येणे आहे. साधी मागणीसुध्दा शासनाकडे केलेली नाही. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. याबाबत शिक्षण विभाग किंवा इमारत विभागाकडे जबाबदारी निश्चित करून येणाऱ्या सहा सात महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी. प्रशासनाने शहरातील जुन्या पाईप लाईन बदलण्याचे वेळोवेळी प्रयोजन करते ज्यामध्ये सिआय पाईप की डीआय पाईप त्यांची लाईफ किती कालावधीसाठी असते याचा विचार होणे आवश्यक आहे. माझ्या माहितीप्रमाणे सन १९८६ ला शाह कन्सल्टन्शी या एजन्सीजने एक आराखडा तयार केलेला होता की, सन २००५ पर्यंतची पाईपलाईन टाकावयाची असल्यास तिची लाईफ किती कालवधी पर्यंतची राहील याचा आराखडा तयार केलेला होता. त्याप्रमाणे भविष्यातील वेळोवेळी होणाऱ्या पाईप लाईन बदलण्यामूळे एकंदरीत महापालिकेला किती भूर्दंड होतो याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच बदल घडवून आणावा.

श्री.जागीरदार अजीज : पृष्ठ क्र.२३ वर ८ व्या मुद्दयावर अन्न भेसळ परवाना फिस बायोमेडिकल वेस्ट फिस याबाबत ५०० सदस्यांची नोंदणी झालेली आहे आणि २००० पर्यंतची नोंदणी करावयाची आहे. तर ५०० सदस्यांची किती फिस जमा झालेली आहे, याचा उल्लेख कूठेही नाही. आणि दुसरा जकातीचे उद्दिष्ट रू.८१ कोटींचे दाखविलेले आहे ते कमी असून ९० कोटीचे करावे. सगळे नाका कारकुन बदलेले पाहीजे ही माझी मागणी आहे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : शहराची सुंदरता ज्याबाबत आढळून येते ते म्हणजे झाडे/उद्याने आणि लहान मुलांच्या संदर्भात व वयोवृध्द आहेत त्यांच्या संदर्भात आपण काय करतो हा एक मुद्दा आहे. शहर सुंदर राहण्यासाठी कचरा व साफसफाई होणे हे अतिशय महत्वाचा भाग आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे हे शहर क्रिडा,संस्कृती कला व शैक्षणिक बाबतीत ओळखल्या जाते. यामध्ये क्रिडा क्षेत्रामध्ये जे अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे. त्यामध्ये वाढ व्हावे अशी माझी मागणी आहे. दुसरी गोष्ट शहरातील गुंठेवारी बाबतच्या प्रश्नासाठी २.०० कोटीची तरतुद केलेली आहे. त्यात अत्यल्प असून पुन्हा वाढ करण्यात यावे. कोणताही अर्थसंकल्प हा आशावादी ठेवावा. सध्या अर्थसंकल्प मांडुन सातवा महिना चालू आहे. आणि आता पाचच महिने वर्ष संपायला आहेत तेंव्हा मा.आयुक्त यांनी योग्यरित्या नियोजन वार्डनिहाय आहे किंवा नाही याची माहिती द्यावी. या ठिकाणी अशी भावना प्रगट झालेली आहे की, जे पदाधिकारी सदस्य आहेत त्यांच्या वार्डातील कामाबाबत अर्थसंकल्पात जास्त प्रमाणात तरतुद केलेली आहे. तेंव्हा मा.महापौर,स्थायी समिती सभापती व मा.आयुक्त यांनी स.सदस्यांच्या प्रत्येक वार्डातील ज्या खरोखरच उद्यानाच्या समस्या असतील, पापु/ड्रेनेज/स्वच्छते बाबतचे असतील त्या प्राधान्याने करणेसाठी अर्थसंकल्पात तरतुद करावी.

जकातीचे संगणकीकरण जसे करणार आहात तसेच प्रत्येक विभागनिहाय बिलाचे आणि प्रत्येक विभागाचे संगणकीकरण करावे. औद्योगिकरणा करीता सवलत देण्याचे ठरविले आहे. येथील काही कारखाने वाळूजला तर वाळुजचे कारखाने शेंद्रयाला जात आहेत यासाठी महापालिकेतर्फे आवश्यक ती कार्यवाही होणे गरजेचे आहे. सवलत देण्यात आली तर कारखान्याचे स्थलांतर होणार नाही. या महापालिकेमध्ये जेव्हढे कर्मचारी आहेत, मा.आयुक्त ते चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंत महापालिकेचे ओळखपत्र असणे बाबत कार्यवाही करावी.

श्री.नरवडे वसंत : सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात काहीवर न्याय तर काहीवर अन्याय झालेला आहे. जे वार्ड निहाय अर्थसंकल्प एम.ॲण्ड आर तयार केलेला आहे, त्यामध्ये वार्डातील संबंधित अधिकारी यांना पापु किंवा इतर काही समस्या असतील त्या तातडीने मा.आयुक्त यांच्या सूचनेनुसार सोडविता येतील त्यासाठी वार्ड अधिकारी यांचेकडे अधिकार असणे आवश्यक आहे. ते मा.महापौर यांनी करावे. जे वार्डाच्या कामाच्या यादित ते काम आलेले नाही त्यात तो कामाचा समावेश राहील. वाढीव तरतुदीचा यामध्ये समावेश राहील. संगणकीकरण कामासाठी रू.३०.०० लाख खर्च करणार आहोत तेंव्हा या कामासाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे संगणकामध्ये पूर्णपणे प्रशिक्षित आहेत काय? आणि जर प्रशिक्षित नसतील तर विनाकारण संगणकावर खर्च करण्याचे कारण नसावे. जोपर्यंत कर्मचारी संगणक काम करण्यास सक्षम नाहीत तोपर्यंत यावर खर्च करणे योग्य नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत आणि शहरातील विद्युत यंत्रणा कोलमडू नये, यासाठी खाजगीकरण होईल तेंव्हा होईल परंतु तोपर्यंत शहरातील वार्डनिहाय तातडीची योजना अंमलात येणेसाठी विद्युत विभागाकडून जादा रकमेची तरतुद अपेक्षित आहे. जेणे करून स.नगरसेवकांना त्यांच्या वार्डातील विद्युत समस्या सोडविण्यास उपाययोजना करण्यात येईल. शिक्षण विभागात प्रशिक्षक शिक्षक व त्या शाळेतील विद्यार्थी वर्ग यांचेवर नियंत्रण ठेवणारा सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे. जेणे करून शाळांचा विकास व एकंदरीत महापालिका शाळांचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.

श्रीमती किवळेकर जयश्री : २३ व्या अर्थसंकल्पाचे सादरीकरण मा.सभापती यांनी केले व त्यावर गेल्या १ तासापासून जी चर्चा उत्तमरित्या होत आहे, त्याचे मी मनापासून अभिनंदन करते. हा जो अर्थसंकल्प मांडलेला आहे, त्याबाबत शहराच्या विकासाचा दृष्टीकोन समोर ठेवूनच हा मांडण्यात आलेला आहे. त्यामध्ये उद्योजकांना चालना मिळणारा आहे. त्याचप्रमाणे महापालिका ही स्वायत्त संस्था असल्यामुळे नागरीकांना ज्या मुलभूत गरजा आहेत त्या अतिशय चांगल्या पध्दतीने नागरीकांना देण्याच्या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. म्हणजेच रस्ते, पाणी, ड्रेनेज या सर्व बाबीवर नियोजनबध्द दृष्टीकोन ठेवून जनतेला या सर्व सेवा दर्जात्मक दिल्या जातील या अर्थसंकल्पामध्ये ठेवलेला आहे. मी या अर्थसंकल्पाबाबत अभिनंदन करते व मंजुरी देण्यास काहीच हरकत नाही. तसेच मागील पंचवार्षिक योजनेपासून शहरातील अनधिकृत बांधकामातील वसाहतींना भेडसावणारा गुंठेवारी कायदा हा शहरातील समस्या सोडविण्यासाठी आणि मालकी हक्क प्राप्त करून घेण्यासाठी रू.२.०० कोटीची जी तरतुद केलेली आहे, त्याबद्दल मी अभिनंदन करते. मालमत्ता व पाणीपट्टीची वसूलीची रू.६२.०० कोटीची थकबाकी वसूली आहे, त्याबाबत प्रशासनाकडून जर वसूलीसाठीचा जोर लावण्यात आला आणि मा.आयुक्त यांनी गेल्या दोन महिन्यात जी वसूली केली, त्याच पध्दतीने

प्रशासनाने वार्ड निहाय कार्यक्रम लावून जोर लावला तर ६२.०० कोटीची जी वसूली आहे ती प्राप्त करून घेण्यास जास्त त्रास होणार नाही. जेणे करून महापालिकेस रू.६२.०० कोटी ची भर पडून विकासाच्या कामासाठी व शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी कामास येईल. त्याचप्रमाणे शहराचा सन २०२० पर्यंतचा लोकसंख्या वाढ समोर ठेवून पाणी योजनेसाठी जी तरतुद केलेली आहे, त्याबाबत मी खास अभिनंदन करते. यासाठी मा.आयुक्त यांनी जनतेला याबाबत चांगल्याप्रकारे न्याय मिळवून देतील. गेल्या दोन महिन्यात मा.आयुक्त यांनी जे कार्य केले जे की, नागरीकांच्या हितासाठी ७ ते ८ एम.एल.डी. पाण्याचा जो उपसा केला, नविन पंप कार्यान्वित करून जे जनतेच्या पाण्याची समस्या होती ती सोडविले अतिशय चांगला प्रयत्न मा.आयुक्तांनी केलेला आहे. त्यांचेही अभिनंदन करते.

श्रीमती अजरा जबीन : माझ्या वार्डातील बरेचशी कामे अर्थसंकल्पात समाविष्ठ आहेत. तरिही माझ्या परिने काही बाबी समाविष्ठ होणे आवश्यक आहेत. यामध्ये बाबर कॉलनी, नाहेदनगर या भागातील ड्रेनेज लाईन दुरूस्ती व मेंटेंनन्स बाबत खर्चासाठीची तरतुद आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे रस्त्याची देखभाल व दुरूस्तीसाठीची तरतुद होणे आवश्यक आहे. मालमत्ता व पाणीपट्टी वसूली बाबतचे धोरण थोडेसे पॉलिसी शिथील करावे व नागरीक फक्त दोनच महिने टॅक्स भरणेसाठी लक्षात ठेवतात बाकी इतर महिने त्यांच्या लक्षात राहत नाहीत तेंव्हा टॅक्स वसूल वर्षभर करावे व गरीब नागरीकांना सवलत द्यावे. त्याचप्रमाणे बीओटी पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स व बिगर कॉर्पोरेशनची इमारते देणार आहे. मी एवढेच सांगेन की, अनेक बेरोजगार मुले आहेत त्यांना एक रूपये सुध्दा कमाई नाही. यासाठी त्यांचे मेंटेनन्स व रिपेरिंग होणे आवश्यक आहे व त्याची वसूली करून नविन वस्तुंची अर्थसंकल्पात समाविष्ट होणे आवश्यक आहे. यामध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर काम देण्याचे ठरविले आहे. हा प्रकार जनतेला परवडणारे नाही. सिडको हा भाग महापालिकेकडे हस्तांतरीत झालेला आहे काय? जर नसेल तर बरीचशी कामे ही सिडको भागातील वसाहतींसाठी या अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे.

मा.महापौर : सिडकोतील म्हाडाचे वसाहती आहेत तेथील कामाचे व पाणी पुरवठ्याची कामांची तरतुद यात केलेली आहे, बाकी नाही.

श्री.सय्यद खुसरो : माझ्या वार्डातील धार्मिक स्थळात पाणी शिरल्यामुळे मी, गेल्या ५ व्या महिन्यापासून पत्र देवूनही या अर्थसंकल्पात तरतुद केलेली नाही. आणि यासाठी अर्थसंकल्पात तरतुद नाही. मात्र इतर दुसऱ्या कामासाठी आहे. धार्मिक स्थळी पाणी शिरते याबाबतची तरतुद का केली नाही याबाबतचा खुलासा व्हावा.

श्री.शिरसाट संजय : आज या ठिकाणी २३२ कोटीचा अर्थसंकल्प सादर झाला आणि मा.सभापती यांनी आपले मनोगत चांगल्या रितीने मांडले व प्रस्तावित करतांना त्यांनी नमूद केलेली चर्चा यावर पुन्हा भाष्य करण्याची गरज पडू नये परंतू काही गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो मा.सभापती यांचेकडे अर्थसंकल्प सादर होणेपूर्वी प्रशासनाकडे अर्थसंकल्प तयार झालेला असतो अर्थसंकल्प सादर करतांना संकेता प्रमाणे दरवर्शी मा.सभापतीच्या मा.महापौर यांचे फोटो बदलतात विशेष बदल नसतो आपणाकडील प्रचलित पध्दत पाहता हा अर्थसंकल्प पूर्ण होईल असे मला वाटत नाही ज्यावेळेस आम्ही म्हणालो पाणीपट्टी रूपये १२००/-वरून १८००/-वाढ करायची नाही जनतेला ते परवडणारे नाही तेव्हा ती वाढ रू. ६००/- ने केली पर्यायाने उद्दिष्ट गाठतांना एक रूपया सुध्दा

वाढलेला नाही यामूळे या आर्थिक वर्षात शहरात नविन नळ कनेक्शन किंवा बाधंकामासाठी इमारती तयारच झाल्या नाहीत असे वाटते. मालमत्ता वसूली बाबत करमूल्य निर्धारण व संकल्क अधिकारी हे आहेत मालमत्ता वसुली बाबत मी एकदा बोललो होतो ही ३०० पट वाढ होते आहे तेंव्हा करमूल्य निर्धारण अधिकारी यांनी सांगितले की तुम्ही चिंता करू नका मी पूर्णपणे वसूली करून दाखवितो. आजही मालमत्ताच्या वसुलीत काहीही फरक झालेला नाही आता सध्या नवीन उपआयुक्त महसूल हे आलेले आहेत काहीही तरी मी माझी वसूली करून दाखविल डिसेंबर महिण्यात जेव्हा रिवाईजड अर्थसंकल्पाची बैठक होईल तेव्हा मा.आयुक्त यांना विचारणा करावी लागेल मागिल वर्षी १७३ कोटीचा अर्थसंकल्पावरून रिवाईजड अर्थसंकल्प स्थायी समितीत १५० कोटीचा आला आणि १५० कोटीवरून १२२ कोटी वसुली झाली अर्थसंकल्पात जी कामे टाकली जातात ती अंदाजे टाकली जातात मागिल वर्षी तत्कालीन आयुक्त श्री जोशी साहेब होते त्यांनी सांगितले की मी स्पिल ओव्हरची जी कामे आहेत ती मी बंद करणार आता ते डब्बल झाले म्हणजे १५ कोटीचा स्पिल ओव्हरची कामे ३० कोटीवर गेलीत आज मालमत्ता, पाणीपट्टी व जकातीची वसूली कशी झाली पाहिजे यापेक्षा स.नगरसेवकांना वाटते माझ्या वार्डात कामे कशी जास्तीचे होतील या बाबीवर कितीही चर्चा केली तरी प्रशासन या गोष्टीवर हालतच नाही ही भावना झाल्यामूळे आपण प्रशासनावर न बोललेल बरं. यासाठी संबंधित वार्डातील वार्ड अधिकारी व कर निरीक्षक यांचेवर जबाबदारी टाकणे आवश्यक आहे. महापालिकेची अवस्था वसूली करतांना अत्यंत निकृष्ट टीम वर्क आहे. संबंधित वार्डातील वसूली कर्मचाऱ्यापासून वार्ड अधिकाऱ्यापर्यंत जबाबदारी निश्चित करावी व त्यांना उत्कृष्ट कामाची वसूली बाबत प्रोत्साहन पुरस्कार द्यावे. आणि जर त्यांनी वसूली केली नाही तर संबंधितांचे एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्याची कार्यवाही करावी. तोपर्यंत ही वसूली चांगल्या पध्दतीने होणार नाही. जकातीबाबत वाढ होणेसाठी जकातीची हद्द वाढणे आवश्यक आहे. जोपर्यंत हद्द वाढणार नाही, तोपर्यंत उत्पन्न वाढणार नाही. छावणी बोर्डच्या ठिकाणी आज रस्ते बरोबर नाही. परंतु त्यांच्या हद्दीच्या ठिकाणी ते टॅक्स वसूली करतात. यासाठी मी मा.महापौर यांना विनंती करतो की, स.पदाधिकारी व जे नविन स.नगरसेवक आहेत, ज्यांच्या वार्डातील कामांचा समावेश नाही, त्यांना एकत्रीत बसवून त्यांच्या वार्डातील कामाचा समावेश करावा.

सौ.मोमीन सफिया : उड्डाणपुल रेल्वेस्टेशनच्या बाजूला साईट गटर होणे आवश्यक आहे. सिल्कमिल कॉलनी, सागर हॉटेल ते बिड बायपास रोड, महानुभाव आश्रम पर्यंतच्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी. तसेच सिल्कमिल, मोमीन कॉलनी येथील रस्त्यांचे खडीकरण बाबत तरतुद असावी. कॉक्रींटसाठी धनगरवाडा साईट गटर कमीत कमी रू.५.०० लाखाची तरतुद ठेवावी. महापालिका मंगल कार्यालय,सिल्कमिल,मोमीन कॉलनी हे काम पूर्ण करणेसाठी रू.२.०० लाखाची तरतुद करावी. अबरार कॉलनी स्लम विभागासाठी रू.५.०० लाख व ड्रेनेजसाठी रू.५.०० लाखाची तरतुद करणे. माझ्या वार्डासाठी फार आवश्यकता आहे. सिल्कमिल, धनगरवाडा येथिल नाल्याची रिटरनिंग वॉल बांधणेसाठी रू.१०.०० लाखाची तरतुद करावी. अबरार कॉलनी येथिल कॉंक्रीटसाठी रू.५.०० लाखाची तरतुद करावी.

सौ.मेहरून्नीसा बेगम : रू.१४.०० लाखाची एस.टी.कॉलनीतील रिटरनिंग वॉल तोडण्यात आली ती तयार करण्यासाठी तरतुद करावी. या भागातील २२३ लोकांच्या घरात पाणी शिरले त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आणि नेहरूनगर कटकट गेट येथील आरसीसी पुल बांधणेसाठी आर्थिक तरतुद या अर्थसंकल्पात करणेत यावी.

श्रीमती पाटील अलका : वार्ड क्र.११ भडकल गेट, नुर कॉलनी येथिल रिटरनिंग वॉलसाठी थोडीशी तरतुद केली आहे तेंव्हा नुर कॉलनी म्हणजे नेमकी कोणती. याचा खुलासा नाही. नुर कॉलनी भागात कमीतकमी २०० ते ३०० लोकसंख्या असलेली वस्ती आहे. तर त्या ठिकाणी सन १९९५ पासून आजपर्यंतही रिटरनिंग वॉल बांधलेली नाही. या अर्थसंकल्पात मी पत्र देवूनही तरतुद केलेली नाही याचे कारण काय? तेंव्हा या बाबत तरतुद ठेवावी.

सौ.आबेदा बेगम : सिडकोतील पाणी अल्तमश कॉलनीतील घरात शिरते या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्रीमती आशा बिनवडे : महापालिकेचे २०० कोटी गाठलेला अर्थसंकल्प असल्याने मी,मनापासून मा.सभापतींचे अभिनंदन करते. महत्वकांक्षा मोठी ठेवणे हे काही चूक नाही. परंतु महत्वकांक्षा किंवा पल्ला गाठणे बाबत आम्ही प्रयत्न करू. शहराचा अर्थसंकल्प हा सर्वांगिण विकासाचा असणे हा समतोल असणे आवश्यक आहे. आणि यासाठी उत्पन्न व खर्च या दोन्हीही बाबींचा विचार आपल्याला करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आमच्या वॉर्डात काय खर्च करता येईल हे न पाहता विश्वस्त म्हणून उत्पन्नाच्या बाजूचा विचार करणे आपले कर्तव्य आहे. आणि या अर्थसंकल्पामध्ये जमा व खर्च या दोन्ही बाजूचा समतोल विचार केलेला आहे असे मला वाटते. जर आपण उत्पन्नाचे स्त्रोत जर शोधले नाही तर खर्च आपण कसे करू शकु आणि या अनुषंगाने महत्वाचे स्त्रोत असणारे जकात, या जकातमध्ये संगणकीकरण करून चल कॅमेरे ठेवणे आवश्यक आहे. व जकातीच्या बाबतीत काही सुधारणा आहेत त्या सुधारणा नाही केल्या तर याला काहीही अर्थ राहणार नाही. दुसरे म्हणजे बंद झालेले कारखाने किंवा उद्योजक यांना करामध्ये सुट देण्याचे जे धोरण ठेवलेले आहे ते अतिशय चांगले आहे. सामान्य नागरीकांचा किंवा मध्यमवर्गीय नागरीकांचा जर विचार केला तर आज ११४ वसाहती ज्या अनधिकृत वसाहती आहेत, गुंठेवारी विकासातंर्गत जे कायद्याच्या कचाट्यात सापडलेले आहेत, नुकत्याच महापालिकेच्या निवडणूका होवून गेल्या आणि याबाबत सर्वच सदस्यांना अनुभव आलेला आहे. नागरी समस्या सोडवितांना आम्ही नागरीकांना काय उत्तर द्यावे याचा प्रश्न आमच्या समोर होता. एकीकडे या गुंठेवारी पध्दतीत जे लोक या अनधिकृत ठिकाणी आपले बांधकाम कायदेशिररित्या करणार नाहीत तेथे आम्ही विकास करणार नाही अशी भूमिका कायद्यातंर्गत आहे. पण एकिकडे आरक्षण असतील किंवा त्यांच्या मालकी हक्काचे प्रश्न असतील याकडे बोट दाखवून आपण संचिका परत करतो आणि ते आपण करू शकत नाही, म्हणजे तुमची कामे कायदेशीर करून घेणार नाही तोपर्यंत आम्ही विकास कामे करणार नाहीत आणि तुमच्या विकासाची कामांच्या संचिका आम्ही मंजूर करू शकत नाही. असे आम्ही सांगतो. यासाठी या प्रकरणी कुठेतरी निराकरण झाले पाहिजे. म्हणून मा.सभापती यांनी रू.२.०० कोटीचे तरतुद करून विकासाचे पहिले पाऊल टाकलेले आहे. त्याच्यासाठी पुढे चालणा देण्यासाठी प्रशासनाला यापुढे खूप काही करावयाचे आहे. काही स.सदस्यांनी मागिल अर्थसंकल्पाबाबत टिका केली की, मागील अर्थसंकल्प १७७ कोटीवरून १२२

कोटीपर्यंतचा कमी झाला, आणि या वेळेला तर ११० कोटी अधिक उत्पन्नाची बाजू प्रशासनाला पूर्ण करावयाची आहे. प्रशासनाने मा.स्थायी समितीमध्ये २२३ कोटीचे उद्दिष्ट अंदाजपत्रकात ठेवलेले होते म्हणजे तेवढे उत्पन्न आपण मिळवणार आहोत. म्हणून प्रशासनाने रिवाईज्ड अंदाजपत्रक का होईना हा टप्पा आपण या वर्षासाठी गाठावा असे प्रयत्न आपण केले पाहीजे. यावर्षीचे अंदाजपत्रक सर्वसामान्यासाठीचे असून यासाठी प्रशासकीय जोड महत्वाची आहे.

श्री.दाभाडे मिलींद : २००५-२००६ चे जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे, या महापालिकेतील कर्मचारी रात्रंदिवस एक करून सतत झटत असतात या शहरातील साफसफाई करण्यासाठी सिंहाचा वाटा आहे त्या कर्मचाऱ्यांसाठी बोनस संदर्भात या अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे काय? केली नसल्यास ती या अंदाजपत्रकात करण्यात यावी.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : अंदाजपत्रकावर चर्चा करीत असतांना बरेचसे स.नगरसेवकांनी या अर्थसंकल्पात असे केलेले नाही,तसे केलेले नाही अशी चर्चा होत आहे. या महापालिकेमध्ये सत्ताधारी म्हणून आपण गेली १५ वर्षापासून आहात या अडचणी सोडवण्यासाठी आपण जर प्रयत्न केले असते तर बऱ्याचशा गोष्टी झाल्या असत्या. विरोधी बाजूचे आम्ही असतांना हा अर्थसंकल्प आम्ही आशावादी ठेवून चांगला आहे असे ठेवतो. याच बरोबर या अर्थसंकल्पात जी तरतुद केलेली आहे, त्यामध्ये ५-६ महिन्यामध्ये जे पदाधिकारी आहेत ते कसे उपयोग करून घेतात यावर अवलंबून आहे. जी तफावत राहणार अशी काहींची भावना ठरलेली आहे ती सभागृहाने स.सदस्यांनी विचारलेल्या,सूचविलेल्या प्रमाणे सभागृहातच दुरूस्त्या व्हाव्यात. कुणालाही अधिकार देण्याचा प्रयत्न होवू नये. कारण या सभागृहात एकंदर ९८ नगरसेवक आहेत. त्यांच्या सर्वांच्या विचाराने हे सभागृह चालावे. कूणीही ४-५ नगरसेवकांनी सांगावे व करावे हे लोकशाही दृष्टीने हिताची बाब नाही. जे काही बदल किंवा सूचना असतील त्या याच अंदाजपत्रकात २-३ दिवस लागले तरी चालेल परंतु सभागृहातच सर्वानुमते तयार व्हावे.

श्री.शिरसाट संजय : स्थायी समितीने जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे त्यास तत्वत: मंजुरी द्यावी.

सौ.नजमा कुरैशी : माझा वार्ड शाह बाजार, अशोकनगर आहे. या वार्डासाठी कोणतेही कामाची तरतुद अंदाजपत्रकात नमूद नाही. जे अंदाजपत्रकात तरतुद १३.५० लाखाची केलेली, शाहबाजार / अशोकनगरसाठी ते रद्द करण्यात आलेले आहे. तेंव्हा पुन्हा सदरील तरतुद करणेत यावी. आणि अशोकनगरमध्ये जे गरीब लोक राहतात त्यांच्यासाठी रिटरनिंग वॉल करणे जरूरी आहे. त्यानंतर काचिवाडा,शाहबाजार येथील कामासाठी७.५० लाखाची तरतुद होती. तेथिल काम २.०० लाखापर्यंत झालेले आहे. बाकीचे काम बाकी आहे, यासाठी ५.३० लाखाची तरतुद पुन्हा करावी.

श्री.दाभाडे हिम्मत : अंदाजपत्रकात आतापर्यंत बरीच चर्चा झालेली आहे. परंतु बऱ्याचशा नगरसेवकांच्या वार्डामध्ये अंदाजपत्रका बाबत अन्याय झालेला आहे. आजपर्यंत वार्ड क्र.९० मध्ये फुलेनगर, एकनाथनगर,द्वारकापुरी, संजय कॉलनी,भिमपुरा, तुळशी अपार्टमेंट आणि शाह कॉलनी च्या वसाहती आहेत. या वसाहतींच्या विकासासाठी १०/१५ लाखाची तरतुद केली तरी विकास होणार नाही असे माझे मत आहे. निवडणूका होवून आता जवळपास ६ महिन्याचा कालावधी लोटलेला आहे. माझ्या भागामध्ये ९०% लाईट बंद आहेत, असे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितलेले आहे. जर चार महिन्यात तेथील लाईट लागले जात नसतील तर

आता तुम्ही जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे, आता चार महिन्याचा कालावधी लोटलेला असून पुढील आठ महिन्यात रस्ते, ड्रेनेज, व लाईटची व्यवस्था झाली पाहिजे अशी आम्ही मागणी करणार. जेंव्हा प्रत्यक्षात कामास मंजुरी देणेसाठी या टेबलवरून त्या टेबलवर संचिका जावून अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे यात बराच वेळ वाया जातो. माझ्या एकनाथनगर वार्डातील रिटरनिंग वॉलची द्वारकापुरी येथिल पाण्याची पाईप लाईन टाकणेसाठी या अंदाजपत्रकात तरतुद करणेत यावी. आणि मा.महापौर व संबंधित अधिकाऱ्यांकडे जे पत्राद्वारे आम्ही काम करवून घेण्यास कळवू त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री.नरवडे वसंत : औरंगाबाद शहराच्या साफसफाई साहित्य खरेदीबाबत रू.२५.०० लाखाची जी तरतुद केलेली आहे, घमेले, झाडू,फिनेल इ.पान क्र.८२ वर त्यामध्ये साहित्य खरेदीची तरतुद आहे. परंतु काही वार्डातील घंटागाड्याची परिस्थिती वाईट आहे. गाड्या खरेदी करण्यासाठी यामध्ये तरतुद व्हावी. कारण काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास गाडी बरोबर कचरा व्यवस्थित आणता आला पाहिजे. तसेच नाला सफाईसाठी रू.६०.०० लाखाची तरतुद केलेली आहे, नाला सफाई करित असतांना फक्त कचरा उचलला जातो. खालची माती/कचरा काढल्या जात नाही. यासाठी मशीन खरेदीसाठी तरतुद शुन्य आहे. आपण नाशिक व इतर ठिकाणी पाहणी करून आलात तसा या अंदाजपत्रकात कुठेही उल्लेख नाही. यासाठी महापालिकेने नाला सफाई ही मशिन खरेदी करूनच करावे. नाला सफाईचा प्रश्न औरंगाबादेत ज्वलंत प्रश्न आहे. लोकांच्या घरात पाणी शिरते, नाला सफाई करीता गुत्तेदार गोमटेश मार्केटच्या खालच्या ठिकाणी जावू शकत नाही. तेंव्हा आपण मशिन खरेदी करूनच हे काम केले, तरच शक्य आहे. या पावसाळ्यात जे औरंगपुरा येथे शिवाईचे बांधकाम चालू आहे, त्या बांधकामावरून पाणी वाहत होते. तेथील कॉलमला अडकुन कचरा साचलेला आहे. तेंव्हा परिस्थिती लक्षात घेऊन व नागरीकांना त्रास होणार नाही याची जाणीव ठेवून मशिन खरेदी करण्यास आर्थिक तरतुद करावी.

श्री.धिल्लन तरविंदरसिंग : आजच्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मंजुरी देतांना कुणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी. बऱ्याचशा भागातील समस्यांबाबत तरतुद या ठिकाणी केलेली नाही, उदा.ड्रेनेज,पाणी,रस्ते इ.ची व्यवस्था करणेत यावी व दि.०१ जानेवारी २००१ च्या शासन निर्णयाद्वारे २% नगरसेवक स्वेच्छा निधीसाठी केलेले आहे ते वाढवून ३% नगरसेवक स्वेच्छा निधी मंजूर करून शासन परवानगी घ्यावी. बी.ओ.टी. पध्दतीद्वारे नेहरूभवन येथील कामाचे बाबतीत आमचा विरोध आहे. द्यावयाचे झाल्यास सर्व इमारतींचे एकत्रीत प्रस्ताव ठेवूनच द्यावे. मात्र बी.ओ.टी. पध्दतीने कोणतेही काम करणेत येऊ नये. नेहरूभवन दुरूस्तीसाठी रू.१.०० लाखावरून रू.१०.०० लाखाची दुरूस्तीची तरतुद करावी.

श्री.जागीरदार अजीज : नेहरू भवनचे काम बी.ओ.टी. पध्दतीने करू नका अशी आमची मागणी आहे.

श्री.कराड भागवत : नेहरू भवन येथिल काम झालेले आहे, फक्त दुरूस्ती करावयाचे आहे, ती दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.धिल्लन तरविंदरसिंग : महापालिकेला १९८२ पासून १८ खेड्यांचा समावेश करणेत आला होता तेथील विकासाचे बाबतीत तरतुद केली किंवा नाही. त्याचप्रमाणे आपत्कालीन परिस्थिती शहरासाठी उद्‌भवल्यास त्यासाठी रू.२५.०० लाखाची तरतुद करावी. २० जुलै रोजी शहरात फार मोठ्या प्रमाणात पावसामुळे घरांची पडझड झाली, त्यांना पंचनाम्या नुसार मदत द्यावी. आणि कोणतेही अंदाजपत्रकात नविन इमारतीसाठी

तरतुद करू नये. आणि ज्या स.नगरसेवकांच्या वार्डातील कामांची तरतुद यात केली नाही त्या भागातील कामाबाबत मी यादी आपणाकडे सादर करीत आहे, त्याप्रमाणे तरतुद करावी.

श्री.अ.रशिद खॉन (मामु): अंदाजपत्रकीय सभेमध्ये काही स.सदस्यांनी चर्चा करतांना सूचित केले की, काही अचानक नैसर्गिक आपत्ती आल्यास त्यासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करावी. व मदत करावी. पाण्यामुळे नाल्या लगत रिटरनिंग वॉल तातडीने बांधायची असते याबाबतची तरतुद करणे आवश्यक आहे. आणि बिल्डींग बाबतची ही तरतुद करणे आवश्यक आहे. यावर्षी आपण टॅक्स वसूलीची थकबाकी ३० कोटीची दाखविली त्यानंतर पाणीपट्टी असे मिळून १५ कोटीची वसूली प्रशासन करेल काय? केवळ मार्च महिन्यात वसूलीला जोर न धरता आता पासूनच वसूलीला जोरदार सुरूवात करावी. आपण बाहेरील प्रायव्हेटलायझेशन समजा केले तर जकातीचे ८५ कोटीचे वसूली होईल व प्रशासनातर्फे केल्यास ८० कोटी होते. यासाठी जकात मधील सर्व कर्मचाऱ्यांचे बदली होणे आवश्यक आहे. पृष्ठ क्र.४० वर ९ कोटी २७ लाख दाखविले आहे हे वसूल होईल काय? जे की,मागिल दोन तीन वर्षात फारच कमी वसूली झालेली आहे. आणि आता ३० कोटी आपण दाखवितो कसे? त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.८९ कॉलम नं.३ मध्ये मोठे निवासी कर २००३-२००४ मध्ये ५६ लाख व आता आपण ७३ लाख दाखवितो हे वसूल होईल काय? आताही काही मोठ्या घरांचे व दुकानांचे एनआरव्ही बदल केलेला नाही. दुकानदारांना प्रतिमाह रू.५००/- किंवा १०००/- किराया असतो ते आपण कर लावून वसूल करीत नाही. यासाठी महापालिकेने याबाबत उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पृष्ठ क्र.४२ व ४३ मध्ये प्राणी संग्रहालय यामध्ये आपण रू.२.०० लाख दाखविले तेंव्हा आपण पुन्हा २.०० लाख वाढवुन घ्यावे. त्याप्रमाणे वसूल होवू शकते. तसेच पृष्ठ क्र.४४ कॉलम नं.४ दवाखाना नोंदणी २.०० लाख दाखविले तेंव्हा रू.३.०० लाख आणखी वाढवून द्यावे. पृष्ठ क्र.५१ व ५२ अतिक्रमण बाबत २.०० लाख होते आता ६.०० लाख दाखविले यामध्ये रू.५.०० लाख करावे. रस्ते दुरूस्ती यामध्ये नळ जोडणी, ड्रेनेज खोदणे अशावेळी दुरूस्ती होते. मागील वेळी ४०.०० लाख केले, आता ५०.०० लाख करावे. त्याचप्रमाणे यामधील कॉलम नं.६ मध्ये व जकातमध्ये ४.०० कोटी वाढवावे एकूण ५.६५ कोटीची वाढ होईल. आणि आपल्याकडे अतिक्रमणासाठी २९ पोलीस कर्मचारी आहेत आणि आपण त्यांचेकडून काम काय घेतो. तेंव्हा नळ कनेक्शन व वसूलीसाठी या पोलीस कर्मचाऱ्यांना पाठवावे. व अशा प्रकारे एखादा स्कॉड तयार करावा व ५.६५ कोटी वाढ करून मंजुर करावे.

श्री.कराड भागवत : प्रशासनाने स्वत: २२३ कोटीचे अंदाजपत्रक स्थायी समितीकडे सादर केले. कोणत्याही प्रकारचे कर न वाढविता प्रशासनाने साधारणत: ५० ते ६० कोटी वाढ केलेली आहे, तेंव्हा प्रशासनाला सहकार्य करावे. व प्रशासनाने त्याची अंमलबजावणी करावी. जकातीचे संगणकीकरण व नाक्यावर कॅमेरे बसविणे त्यास कनेक्टीव्हीटी देणेची गरज आहे. कोणत्या नाक्यावर काय चालले याची मुख्य कार्यालयात स.पदाधिकारी व आयुक्त यांना बटन दाबल्यानंतर स्पष्ट दिसू शकेल. व जकात वसूलीवर चांगल्यारितीने परिणाम होईल. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली होणेसाठी आपण एक विशेष न्यायालय स्थापन करणे आवश्यक आहे. याची स्थापना माझ्या काळातच झालेली असून त्यास शासनानेही मंजुरी दिलेली आहे. त्याबाबत मालमत्ता करांच्या छोट्या मोठ्या केसेस या न्यायालयात

चालविल्या तर बरीचशी प्रकरणे निकाली लागून वसूली महापालिकेस होवू शकते. त्याचप्रमाणे अनधिकृत नळ कनेक्शन बाबत सुध्दा अभय योजनेअंतर्गत पूर्णपणे योजना पुन्हा अंमलात आणावी.

श्री.जोशी संजय : मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली बाबतची कार्यवाही प्रशासनाने माहे एप्रिल पासूनच सुरू ठेवावी. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये दाखवावे की, माहे एप्रिल, मे, जून महिन्यात किती प्रमाणात वसूली झालेली आहे. वसूली ही प्रशासनाने जबाबदारी स्वरूपात करावे.

श्रीमती पाटील अलका : २००५-२००६ या अर्थसंकल्पामध्ये कर्मचाऱ्यांना दिवाळीच्यावेळी बोनस देणे आवश्यक आहे. तशी तरतुद करावी.

श्री.घडमोडे भगवान : प्रशासनाने २२३ कोटीचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले आणि स्थायी समितीने फक्त ९ कोटीने वाढविले म्हणजे फार मोठे आव्हान आहे असे वाटत नाही. याबाबत प्रशासनाची तयारी आहे आणि रिव्हाईज्ड अंदाजपत्रकावेळी प्रशासन कुठेही कमी पडणार नाही. कारण सध्याचे आयुक्त तरूण तडफदार असून त्यांची काम करवून घेण्याची पध्दत अतिशय चांगली आहे. अंदाजपत्रकीय चर्चेच्या वेळी स.सदस्यांनी खर्च व जमा या दोन्हीही बाबीचा विचार करून आपले मत मांडणे आवश्यक आहे. जसे जकातीचे संगणकीकरण करणे बाबतचा या अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे, ज्यामुळे जकात वाढीसाठी प्रयत्न होतील. त्याचप्रमाणे मालमत्ता कर वसूलीच्या वेळी संबंधित वार्ड अधिकाऱ्यांनी वसूली कर्मचाऱ्यांना पाठवावे. इतर कूणालाही पाठवू नये ज्यामुळे स.सदस्यांची बदनामी होते. याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे पाणीपट्टी बाबतही शहरातील संपूर्णपणे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. आणि हा सर्वेक्षण एखाद्या एजन्सीज मार्फत करावे. जायकवाडी औरंगाबाद पर्यंतची जी पाईपलाईन आहे, त्याबाबतचे नियोजन तसेच प्रत्येक वार्डातील पाईपलाईनचेही सर्वेक्षण होवून नियोजन करणे आवश्यक आहे. जकातीच्या बाबतीत शिवाजीनगर येथिल नाक्यावर खोटे नांव सांगुन माल आयात केला जातो या बाबत स.सदस्यांनी यापूर्वीही सूचना केल्याप्रमाणे या नाक्यावरील जकात व पावत्या फाडतांना योग्यरित्या फाडतात काय याची प्रशासनाने दखल घ्यावी. व प्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज किती गाड्या आयात होतात त्याप्रमाणेच जकात फाडल्या जाते किंवा नाही, याची शहानिशा करावी.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : पृष्ट क्र.६२ व ६३ यामध्ये जवळपास १०० कोटीचा खर्च प्रशासनाने कर्मचाऱ्यांवर दाखविलेला आहे, ते योग्य नाही. विकास कामावरिल खर्च अधिक असणे गरजेचे आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ : स.सदस्यांनी अंदाजपत्रकीय सभेमध्ये बरीच चर्चा केली, प्रत्येकांनी आपआपल्या वार्ड निहाय कामातील तरतुदीबाबतची मागणी व तरतुदीचा यात चर्चेद्वारे सांगितले. आणि सभापतींनी अंदाजपत्रक योग्य व चांगल्या रितीने सादर केले असे सांगितले याबाबत सभागृहाचे धन्यवाद.

मा.महापौर : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील मुद्दे क्र.१ ते १८ वर सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

श्री.कोकाटे काशिनाथ : अर्थसंकल्पात काही दुरूस्त्या व सूचना आलेल्या आहेत. वेगवेगळ्या पक्षाचे जरी नगरसेवक असले तरी सामजिक बांधीलकी असलेला नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहे. चांगल्या सूचना काही नगरसेवकांनी केलेल्या आहेत. मा.महापौर यांना अधिकार आहे, आलेल्या सूचनेनुसार ते निर्णय घेतील. कोणावर अन्याय झाला असेल त्यात दुरूस्ती करण्याचा अधिकार मा.महापौरांना आहे. काही

सदस्यांनी असे म्हटले कि, बजेट चांगले आहे. ज्याला चांगला अनुभव आहे, असे श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय तसेच सभागृह नेता यांनी मत मांडले आहे. सभापतीकडे बजेट येण्याच्या अगोदर ज्या काही पदाधिकारी यांच्या कल्पना होत्या त्या यात आल्या आहेत. चांगले बजेट असतांना कोणी गालबोट लावीत असेल तर सहन केले जाणार नाही. २३२ कोटीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यावर मी अभ्यास केलेला आहे. व एका कंपनीचा बजेट देखील मी स्वत: केलेला आहे व मला त्याचा चांगला अनुभव आहे. जमा खर्च काय असतो हे मला माहित आहे. मागील वर्षाचे १७३ कोटीचे बजेट १२२ वर येवून १२२ कोटी वसूल केले. वसूली करण्याची जबाबदारी कोणाची होती, गेल्यावेळेस ३२ कोटीच्या स्पीड व यावर्षी २१ कोटी होईल. साडेचार वर्षे मी सदस्य म्हणून राहणार आहे. जबाबदारी घेवून मी यात सर्व काही मांडणार आहे. महापालिकेच्या बजेटमध्ये खर्चाच्या बाबतीत माहिती घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. त्याला या ठिकाणी खर्चही मागण्याचा अधिकार आहे. काही सदस्यांनी सिडकोच्या पाण्याबद्दल मुद्दा उपस्थित केला. मुद्दा बरोबर आहे. त्यासाठी बजेट प्रोविजन नाही असे काहींचे मत झाले परंतु मी त्यांचा आदर करतो. कोणीही चिंता करू नये. बजेटमध्ये तरतुद आहे. ७ एम.एल.डी.पाणी वाढणार आहे. प्रामाणिकपणे बजेट सादर केलेले आहे. मागील वर्षाच्या बजेटमध्ये ५० कोटीची तफावत आलेली आहे त्यास मी सहमत आहे. यापुर्वी काय झाले ते मागे टाकले पाहीजे शंका घेण्याचे कारण नाही. पूर्वीच्या चुका काढूनच व दुरूस्त करूनच हे बजेट ठेवले आहे. चांगला विचार केल्यास मोठे कार्य घडते. यात वसूलीच्या संदर्भात मोठी अपेक्षा करण्यात आलेली आहे. सर्वांनी ठरवले तर वसूली होवू शकते. आपल्याला लाभलेले जे आयुक्त आहेत ते चांगले आयुक्त आहेत. प्रशासनाची स्तुती केली पाहीजे. चुक झाली तर दाखवून दिली पाहिजे. चांगले काम करून घेण्याची जबाबदारी आपली आहे. आयुक्तांचे जर काही नविन विचार असतील तर त्यास आपली सहमती राहील. गुरूगोंविदसिंग यांनी एक नारा दिला होता त्यात असे म्हटले होते 'जो बोले सो निहाल सतश्री अकाल' घोषणा केली आणि त्यावेळेस ते शत्रुवर तुटून पडले आणि त्यावेळेस त्यांनी तो मुकाबला केला. यावर वाईट कोणी विचार करू नये. वाईट बोलू नये. २३२ कोटीच बजेट स्थायी समितीने ठेवले आहे. स्थायी समिती आशावादी आहे. सर्वसाधारण सभा ही आशावादी आहात.हे सकारात्मक बजेट ठेवलेले आहे त्यास मंजूरी दयावी काही सूधारणा करावयाच्या असतील तर कराव्यात . गुरूने जे सांगितले ते शेवटी आचरणात आले पाहिजे.तरी सुध्दा आपला अधिकार आहे आपण दूरूस्ती करून मंजूरी दयावी . गालीचा एक शेर होता ''मानाके इस जहाँको गूलजार न कर सके हम,कुछ खार तो कम करदिये गुजरे जिधर से हम'' कठीण परीस्थितीतून मार्ग काढण्याचे काम आपण सर्व मिळून करूया.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : मा.सभापती श्री.कोकाटे यांनी आमच्या गुरूच्या संदर्भात प्रशंसा केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. या अर्थसंकल्पास आमचा विरोध नसून एक सदस्य म्हणून आम्ही आपल्या निदर्शनास आणून देत आहे. चांगले काम झाले तर प्रशासनाचे अभिनंदन करण्यांत येईल.

मा.महापौर : मा.सभापती यांनी २३२.८८ कोटीचे बजेट सादर केले, सभागृहाचे मत लक्षात घेता मालमत्ता कर व इतर करात वाढ सूचवली त्यात १ कोटीची वाढ करण्यात येत आहे. जकात ८१ कोटी ऐवजी ८३ कोटी करण्यांत येते. एकूण बजेट हे

२३५.८८ कोटीचे करण्यात येत आहे. जायकवाडी पासून सुधारीत जी पाण्याची योजना आहे. त्यासाठी १.५० कोटी तरतुद ठेवतो आहे. त्यामूळे १५-२० एम.एल.डी. पाणी वाढणार आहे. जे बाकी सूचना दिले त्यांचाही समावेश करणार आहोत. शहर सौंदर्यीकरणासाठी १ कोटी असून त्यात २ कोटी वाढ करण्यात येवून ३ कोटी करण्यात येत आहे. २ कोटी गुंठेवारी साठी होते त्यातील ५० लक्ष गुंठेवारी देखभाल दुरूस्तीसाठी व १ कोटी गुंठेवारीसाठी ठेवण्यात येते. रिटर्निंग वॉलसाठी ५० लक्षची तरतुद करण्यात येते. भूसंपादनासाठी १० कोटी ऐवजी ५ कोटी करण्यात येते. गुंठेवारी भागातून जे डी.पी.रोड गेले आहे, त्या रस्त्याचा विकास करण्याला, बी.ओ.टी. डांबरीकरण करण्यांस,बी.ओ.टी पध्दतीवर मच्छलीखडक येथील वसंत भुवन, तसेच भाजी मंडई तसेच गरवारे व या व्यतिरिक्त ठिकाणच्या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी. अमरप्रीत ते शहानुरमियॉ दर्गा रस्त्यावरील जलवाहीन्या व इतर अडथळे दूर करण्यासाठी ६५.०० लक्षाची तरतुद करण्यात येते. स्ट्रीट लाईट खाजगी संस्थेमार्फत देखभाल दुरूस्ती करता येईल का. याबाबत प्रशासनाने तपासणी करावी. व तसा प्रस्ताव सादर करावा. मालमत्ता व पाणीपट्टी कर बँकेच्या मार्फत घेता येईल का. जेणे करून जनतेला सोयीस्कर पडेल याबाबतही तपासणी करून तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा. एस.टी. (बस) च्या संदर्भातही महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरांच्या नागरीकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी ना-नफा-ना-तोटा या तत्वावर खाजगी बसेस घेवून चालविता येईल का, हे पहावे. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या संदर्भात सर्व्हे करण्यासाठी रू.१०.०० लक्षची तरतुद ठेवण्यात येते. कंपाऊंडीग चार्जेसची जी रक्क म जमा होईल, ती भूसंपादनासाठी वापरावी. महापालिका हद्दीत जे बाहेरील रस्ते येतात, त्या रस्त्यावर महापालिका आपले हार्दिक स्वागत करीत आहे, अशा प्रकारच्या कमानी उभाराव्या. सभागृहाच्या संमतीने रू.२३५.८८ कोटीचे अर्थसंकल्पास दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये दि.१२ जुलै २००५ रोजी स्थायी समितीत संपन्न झालेल्या सभेत ठराव क्र.१५ नुसार मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेले सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकावर विचार विनिमय होवून सन २००५-२००६ चे मुळ अंदाज पत्रक रू.२३५ कोटी ८८ लाख ५५ हजार एकूण जमा व रू.२३५ कोटी ७० लाख ४० हजार खर्चास व रू.१८.१५ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे स्थायी समितीतर्फे सन २००५-२००६ वर्षाकरिता सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात सर्वानुमते फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन प्रस्तावास वाढीव रक्कमेची कामे अर्थसंकल्पात नव्याने समाविष्ट करण्याचे सर्व अधिकार मा.महापौर यांना प्रदान करण्यात येऊन अर्थसंकल्प पुस्तिका ही ब्रिफकेसमध्ये सर्व सन्माननिय सदस्य यांना देण्यात यावी या मागणीसह सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात येते.

यानंतर 'राष्ट्रगीताने' सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.